**Second Semester Examination : APRIL - 2020**

**MARATHI (Compostie)**

**Time : 2 Hours** **Std. IX** **Max. Marks : 40**


## विभाग १ ः गद्य

**1. (अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा ः** **(६)**

कितीतरी वर्षांपूर्वीची गोष्ट. उत्तर प्रदेशात वाराणशी नावाचे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. तेथे नीरू नावाचा एक विणकर राहात असे. तो मोठा कष्टाळू व सदाचारी होता. तो आणि त्याची पत्नी दिवसभर विणकाम करून आपले पोट भरत. शेजाऱ्यापाजाऱ्यांचा त्यांच्यावर फार लोभ होता. त्यांना मूलबाळ नव्हते.

एके दिवशी मोठया पहाटे नीरू बाहेर पडला. गावाबाहेर तलाव होता. तेथे तो गेला. इतक्यात त्याला लहान मुलाचे रडणे ऐकू आले. त्या दिशेने तो पुढे गेला. पाहतो तो, तेथे एक लहान मूल रडत पडलेले! त्याने त्याला हळूच उचलले आणि छातीशी घेतले. मूल रडायचे थांबले. तो घरी आला आणि पत्नीला म्हणाला, "बघ, आज सकाळीच आपल्याला देवानं हा प्रसाद दिला."

(1) आकृती पूर्ण करा ः **(2)**




(2) चौकटी पूर्ण करा ः **(1)**

(i) उत्तर प्रदेशातील तीर्थक्षेत्र — ☐


(3) संत कबीर यांच्या जडण-घडणीत असलेले बालपणीच्या संस्कारांचे महत्त्व लिहा. **(3)**

**1. (आ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा ः** **(६)**

एकविसाव्या शतकाच्या मध्यावर घडणारी ही कथा आहे आलोक नाईक नावाच्या विलक्षण बुद्धिमान मुलाची. अंतराळातल्या वसाहतींमध्ये राहून काम करण्यासाठी जगातल्या निवड बुद्धिमान मुलामुलींना विशेष शाळांमध्ये प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येइ. भारतातर्फे एका वर्षी आलोकची निवड झाली आणि तो सिंगापूरच्या शाळेमध्ये दाखल झाला. हुआन चेंग हा चिनी विद्यार्थीही त्याच शाळेत होता.

ज्या परिस्थितीत चेंगची आलोकशी दोस्ती झाली ती 'अद्‌भुत' या सदरात मोडेल. "नवीन विद्यार्थ्याला आत आणा," चेंगने आज्ञा केली. तो एका लांब मध्यभागी राजासारखा ऐटीत बसला होता. त्याच्या दोन्ही बाजुंना पाच-पाच मुले-मुली बसल्या होत्या. ही सिनीअर विद्यार्थ्यांची कमिटी होती आणि चेंग तिचा अध्यक्ष होता.

(1) आकृति पूर्ण करा ः (2)




(2) चौकटी पूर्ण करा ः (2)

(i) कथा घडली ते शतक → ☐

(ii) सिनीअर विदयार्थांच्या कमिटीचा अध्यक्ष → ☐

(3) आकृतिबंध पूर्ण करा ः (2)

☐ ← शहर ← आलोक नाईक → गुण → ☐

## विभाग २ ः पद्य

**2.(अ) कवितेच्या सूचनांनुसार कृती करा ः** (४)

दिवे उजळता, दिवे होऊया।
जळता जळता जग उजळूया।।
डोळे पुसुनि दुःखी जनांचे
त्या अश्रूंच्या ज्योती करूया।
रात्र जरी अंधारी असली
अंधारा आव्हान देऊया।।
थरथरणाऱ्या अनेक ज्योती
एक होऊनि मशाल बनूया।
विश्वातील अवघ्या दुरितांना
तेज-पथाचे यात्री करूया।।
निरांजनाशी सांगत नाती
अंतर-मंदिरी तेज भरूया।
तिमिर-बंधने तोडून सारी
चराचराला प्रकाश देऊया।।

(1) चौकटी पूर्ण करा ः (2)

(i) कवींना वनायचे आहे. → ☐

(ii) दु:खितांच्या अश्रूंच्या बनवूया. → ☐

(iii) अंतर-मंदिरी भरूया. → ☐

(iv) सर्व वंधने तोडून देऊया. → ☐

(2) कवीला काय काय करावेसे वाटते ते कवितेच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा. (2)

**2.(आ) खालील पद्यांशाच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा ः** (४)

दिवस सुगीचे सुरू जाहले
ओला चारा, बैल माजले
शेतकरी-मन प्रफुल्ल झले
छन् खळ् खळ् छन्
ढुम् ढुम् पट ढुम्
लेझिम चाले जोरात!

दिवटी फुरफुर करू लागली
पटक्यांची वर टोके डुलली
रांग खेळण्या सज्ज जाहली
छन् खळ् खळ् छन्
ढुम् ढुम् पट ढुम्
लेझिम चाले जोरात!

भरभर डफ तो बोले घुमुनी
लेझिम चाले मंडल धरूनी
बाजुस, मागे, पुढे वाकुनी
छन् खळ् खळ् छन्
ढुम् ढुम् पट ढुम्
लेझिम चाले जोरात!

(2)

(1) आकृती पूर्ण करा ः

लेझिम खेळणाऱ्यांची तयारी

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

(2) पद्यांशातील प्रथम तीन ओळींचा सरळ अर्थ लिहा. (2)

## विभाग ३ ः भाषाभ्यास

**3. (अ) व्याकरण घटकावर आधारित कृती करा ः** (४)

(1) सुचनेनुसार कृती करा.

(i) गाणे सतत ऐकले पाहिजे. (काळ ओळखा) (1)

(ii) चांदणी प्राणपणाने झुंज देते. (भूतकाळ करा) (1)

(2) खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोडया लावा. (2)

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| (i) झडपं घालणे | सामना करणे |
| (ii) मुकावला करणे | झेप घेणे |
| | दूर जाणे |

**3. (आ) शब्दसंपत्तीवर आधारित कृती करा ः** (४)

(1) विरूद्धार्थी शब्द लिहा. (1)

(i) दिवस × ☐ (ii) कमी × ☐

(2) खालील शब्दांचे लिंग बदला. (1)

(i) पत्नी ☐ (ii) मुलगा ☐

(3) अचूक शब्द ओळखून लिहा. (1)

(i) कष्टाळू , कष्टाळु , कश्टाळु , कश्टाळू

(4) पुढील विरामचिन्हांची नाव लिहा. (1)

(i) ? (ii) ,

## विभाग ४ ः उपयोजित लेखन

**4. (अ) पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा ः** (४)

**मागणीपत्र**

शाळा व विदयार्थ्यांना सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!!

साफल्य बुक डेपो, नाशिक, यांच्याकडून माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम

यांना आगळीवेगळी आदरांजली

वाचन प्रेरणादिनानिमित्त कोणत्याही वाचनीय पुस्तकावर ५०% सवलत.

विद्यार्थी या नात्याने स्वत:साठी तुमच्या आवडीच्या पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

सवलत 15 ऑगस्ट ते 16 ऑक्टोबर

-: स्थळ :-

साफल्य बुक डेपो, मंगळवार, पेठ नाशिक

शलेय ग्रंथालय प्रमुख या नात्याने साफल्य बुक डेपोकडे पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

**4. (आ) पुढीलपैकी कोणत्याही एका कृती सोडवा :** (४)

(1) **जाहिरात :** "फॅन्शी बॅग्ज" या विषयावर जाहिरात तयार करा.

(2) **बातमी :** खालील विषयावर बातमी तयार करा :


'करोना विषाणू' (काळजी करू नका... सावध रहा)

(3) खालील उतारा वाचून त्यावर *चार प्रश्न* तयार करा.


> रोजचा दिवस आपल्यापुढे नवीन आव्हाने घेऊन येतो. ती आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य अंगी बाणायचे असेल तर स्वतःला घडवले पाहिजे. स्वतःला घडवायचे ते कशासाठी, तर जीवनात यशस्वी होण्यासाठी. यश म्हणजे नेमके काय? आपण जे उद्दिष्ट ठतवलेले असते, ते प्राप्त करणे म्हणजे यश. आपल्या प्रत्येकाच्या अंगी काही कौशल्ये असतात, गुणवत्ता असते. त्या कौशल्याची, गुणवत्तेची सर्वोत्तम पातळी गाठणे म्हणजेच यश.
>
> यश मिळवणे जितके महत्त्वाचे असते, त्यापेक्षा मिळवलेले यश टिकवणे अधिक महत्त्वाचे असते. स्वकष्टाने निर्माण केलेले स्थान टिकवण्यासाठी आपल्याला रोज नवे नवे शिकावे लागते. हे शिकत असताना चुका होणे काहीच गैर नाही; पण एकदा केलेली चूक पुन्हा पुन्हा करणे मात्र आपल्या प्रगतीतील धोंड आहे. तुमची खरी स्पर्धा इतरांशी नसते. ती स्वतःशीच असते. इतरांशी तुलना जरूर करावी; पण ती स्वतःची क्षमता वाढवण्यासाठी, दुस याला कमी लेखण्यासाठी नव्हे.

**4. (इ) पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करा :** (४)

(1) **वर्णनात्मक :**




(2) **आत्मकथन :** 'वृक्ष' तुमच्याशी बोलत आहे अशी कल्पना करून वृक्षाचे आत्मकथन लिहा




............